सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.
शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२६/2352
दिनांक :- 09 सप्टेंबर 2026

प्रति,

**प्राचार्य,**
**सर्व तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्था**
**अमरावती विभाग, अमरावती**

विषय:- **नशामुक्त् भारत अभियान (NMBA) अंतर्गत उच्च शैक्षणिक संस्था (Higher Education Institutions-HEIs) व्यसनमुक्त करण्याच्या अनुषंगाने विविध प्रतिबंधात्मक व जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत.**

संदर्भ: १.समाज कल्याण आयुक्तालय,पुणे यांचे पत्र क्र.सकआ/व्य.का./न.म.अ./२०२५-२६/का-१७/२८८,दिनांक-२०/०८/२०२६
२.मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६/तंशिसं/नशामुक्ती/२०२६/१७९, दिनांक- ३१/०८/२०२६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत National Action Plan for Drug Demand Reduction (NAPDDR) अंतर्गत **'नशामुक्त भारत अभियान'** (Nasha Mukt Bharat Abhiyaan-NMBA) देशभरात प्रभावीपणे राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत युवक आणि शैक्षणिक संस्थांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्रानुसार higher education institutions (HEis) उच्च शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या मोठी असल्याने, व्यसन प्रतिबंध, जोखीमग्रस्त विद्यार्थ्यांची वेळेत ओळख,समुपदेशन,जनजागृती व आवश्यकतेनुसार उपचार/पुनर्वसन सेवांशी जोडणी करण्याच्या दुष्टीने त्यांना व्यसनाधीनतेपासून दूर ठेवण्यासाठी संस्थेची भूमिका अत्यंत महत्त्वपूर्ण आहे.

तरी, त्या अनुषंगाने सोबत सादर केलेल्या संदर्भिय क्र.१ च्या शासनपत्रानुसार आपल्या संस्थेतील सर्व घटकांपर्यंत या सूचना तात्काळ पोहोचवून नशामुक्ती भारत अभियानाची कडक प्रभावी अंमलबजावणी करावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयाकडे सादर करावा.

सहपत्र- वरिलप्रमाणे

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

प्रत:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरिता.

सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई ४०० ००१.
दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४०९/४२९,
ई-मेल-desk16@dtemaharashtra.gov.in,वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in

क्र.१६/तंशिसं/नशामुक्ती/२०२६/७७८ दिनांक: 3 1 AUG 2026

प्रति,

१) सहसंचालक,तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,
मुंबई / पुणे / नाशिक / छत्रपती संभाजीनगर / अमरावती / नागपूर.

२) संचालक,
महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ, म.रा., मुंबई.

विषय : नशामुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत उच्च शैक्षणिक संस्था (Higher Education Institutions-HEIs) व्यसनमुक्त करण्याच्या अनुषंगाने विविध प्रतिबंधात्मक व जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ : समाज कल्याण आयुक्तालय, पुणे यांचे पत्र क्र. सकआ/व्य.का./न.म.अ./२०२५-२६/का-१७/२८८ दिनांक २०.८.२०२६.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भात कळविण्यांत येते की, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत National Action Plan for Drug Demand Reduction (NAPDDR) अंतर्गत नशामुक्त भारत अभियान (Nasha Mukt Bharat Abhiyaan-NMBA) देशभर राबविण्यात येत आहे. सदर अभियानामध्ये युवक, महिला तसेच शैक्षणिक संस्थांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्रानुसार Higher Education Institutions (HEIs) मध्ये युवकांची मोठी संख्या असल्याने व्यसन प्रतिबंध, जोखीमग्रस्त विद्यार्थ्यांची वेळेत ओळख, समुपदेशन, जनजागृती व आवश्यकतेनुसार उपचार/पुनर्वसन सेवांशी जोडणी करण्याच्या दृष्टीने उच्च शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तरी सोबत सादर केलेल्या शासनपत्रानुसार विभागाअंतर्गत येणाऱ्या सर्व संस्थानी आवश्यक सूचना तात्काळ निर्गमित करुन नशामुक्ती भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी.

सोबत: वरीलप्रमाणे

(डॉ. धनपाल कांबळे)
सहसंचालक
तंत्र शिक्षण संचालनालय म. रा., मुंबई.

महाराष्ट्र शासन

समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, ३, चर्च रोड, पुणे ४११ ००१.

दुरध्वनी क्रमांक ०२०-२६१३७०११ ई-मेल-dao.socwelfare@gmail.com


जा.क्र.सकआ/व्य.का/न.म.अ./२०२५-२६/का-१७/२८८ दि.२०.८.२०२६

प्रति,

१. संचालक,
उच्च शिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य मुंबई.

२. संचालक,
तंत्रशिक्षण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय : नशामुक्त भारत अभियान (NMBA) अंतर्गत उच्च शैक्षणिक संस्था (Higher Education Institutions-HEIs) व्यसनमुक्त करण्याच्या अनुषंगाने विविध प्रतिबंधात्मक व जनजागृती उपक्रम राबविण्याबाबत.

संदर्भ : १. जा. क्र. डीडीपी-२०२६/प्र.क्र.१०८/सामासु दि. २५/०६/२०२६

२. भारत सरकार, सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय, D.O.No. DP/7/2023-DP-I Date: May 6, 2026

भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालयामार्फत National Action Plan for Drug Demand Reduction (NAPDDR) अंतर्गत नशामुक्त भारत अभियान (Nasha Mukt Bharat Abhiyaan-NMBA) देशभर राबविण्यात येत आहे. सदर अभियानामध्ये युवक, महिला तसेच शैक्षणिक संस्थांवर विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले आहे.

केंद्र शासनाच्या संदर्भीय पत्रानुसार Higher Education Institutions (HEIs) मध्ये युवकांची मोठी संख्या असल्याने व्यसन प्रतिबंध, जोखीमग्रस्त विद्यार्थ्यांची वेळेत ओळख, समुपदेशन, जनजागृती व आवश्यकतेनुसार उपचार/पुनर्वसन सेवांशी जोडणी करण्याच्या दृष्टीने उच्च शैक्षणिक संस्थांची भूमिका महत्त्वपूर्ण असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्याअनुषंगाने आपल्या अधिनस्त सर्व संबंधित उच्च शैक्षणिक संस्थांना खालीलप्रमाणे आवश्यक सूचना निर्गमित करण्यात याव्यात :-

१. Preventive Education: उच्च शैक्षणिक संस्थांमधील सर्व विद्यार्थ्यांसाठी Substance Use Disorder विषयावर २-Credit Value Addition Course राबविण्याच्या दृष्टीने आवश्यक कार्यवाही करावी. याबाबत केंद्र शासनाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना स्वतंत्रपणे प्राप्त होणार आहेत.

२. Credit-based Internship Opportunities: विशेषतः Social Work व Psychology विषयातील विद्यार्थ्यांना DoSJE समर्थित व्यसनमुक्ती केंद्रे, Addiction Treatment Facilities (ATFs), वैद्यकीय महाविद्यालये/शासकीय संस्थांमधील व्यसनमुक्ती केंद्रे, व्यसन प्रतिबंध क्षेत्रात कार्यरत

NGO/VO तसेच State Drug Demand Reduction Cells येथे Credit-based Internship करण्यासाठी प्रोत्साहित करावे.

३. Sensitization of Freshers: नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या One-Week Induction Programme मध्ये Substance Abuse Prevention या विषयावर स्वतंत्र सत्राचा समावेश करावा.

४. Capacity Building: प्राध्यापक, समुपदेशक व विद्यार्थ्यांसाठी Substance Use Disorder विषयक प्रशिक्षण आयोजित करावे. त्यासाठी SWAYAM, Madan Mohan Malaviya National Mission on Teachers and Teaching (MMMNMTT) तसेच Chetna Lecture Series यांसारख्या माध्यमांचा उपयोग करावा.

५. Awareness Generation: वार्षिक स्नेहसंमेलने, Youth Festivals, Sports Events, Vice-Chancellors॰ Conferences तसेच Campus Community Radio Stations यांच्या माध्यमातून व्यसनमुक्तीविषयक जनजागृती उपक्रम राबवावेत.

६. संस्थांमधील महत्त्वाच्या कार्यक्रमांच्या वेळी NMBA Pledge घेण्यात यावी तसेच विद्यार्थी व प्राध्यापकांमध्ये NMBA e-Pledge Portal ची व्यापक प्रसिद्धी करावी.

७. National De-Addiction Helpline - १४४४६ बाबत विद्यार्थी, पालक/पालकप्रतिनिधी यांच्यामध्ये जनजागृती करावी; आवश्यकतेनुसार समुपदेशन सहाय्य तसेच DoSJE समर्थित व्यसनमुक्ती केंद्रांची माहिती उपलब्ध करून द्यावी.

८. सदर उपक्रमांना संस्थात्मक माध्यमे, स्थानिक प्रसारमाध्यमे व अन्य योग्य माध्यमांद्वारे आवश्यक प्रसिद्धी देण्यात यावी.

तरी आपल्या अधिनस्त सर्व संबंधित विद्यापीठे/महाविद्यालये/उच्च शैक्षणिक संस्थांना वरीलप्रमाणे आवश्यक सूचना तात्काळ निर्गमित करून नशामुक्त भारत अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत आवश्यक कार्यवाही करावी.

आपली

(दिपा मुधोळ-मुंडे)
आयुक्त, समाजकल्याण
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत :- माहितीस्त व सविनय सादरः-
मा. प्रधान सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

६९
१/२६

समाज कल्याण आयुक्तालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे.
आवक क्र. 6903
दिनांक ०१/०७/०२६

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
मंत्रालय,विस्तार (दालन क्र१४३)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-४०००३२

दूरध्वनी क्र.०२२-२२८२०२० ई-मेल -: so.samasu@maharashtra.gov.in

क्रमांक : डीडीपी-२०२६/प्र.क्र.१०८/सामासु दिनांक :- २५.०६.२०२६.

प्रति.

आयुक्त,
समाजकल्याण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

विषय :-"मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR)" या योजनेंतर्गत अनुदानित तसेच खासगी क्षेत्रातील उच्च शिक्षण संस्थांमार्फत विविध उपक्रम राबविण्याबाबत

संदर्भ:-सामाजिक न्याय व सक्षमीकरण, भारत सरकार यांचे अ.शा.पत्र क्र.DP/७/२०२३-DP-I, दि.०६.०५.२०२६.

उपरोक्त विषयाच्या संदर्भाधीन अ.शा. पत्राचे कृपया अवलोकन व्हावे.

०२. सामाजिक न्याय व अधिकारिता विभाग (DoSJE) हा देशातील अमली पदार्थांच्या मागणी कमी करण्यासाठीचा (Drug Demand Reduction) नोडल विभाग असून, जनजागृती आणि प्रसाराद्वारे व्यसनाधीनता रोखण्याण्यासाठी "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR) राबविण्यात येत आहे. सदर योजनेतंर्गत "नशा मुक्त भारत अभियान (NMBA)" दि. १५ ऑगस्ट २०२० रोजी सुरू करण्यात आले असून ते सर्व जिल्ह्यांमध्ये राबविले जात आहे. यामध्ये युवक, महिला आणि शैक्षणिक संस्था यांना प्राधान्य दिले गेले आहे. तसेच,मा. केंद्रीय गृहमंत्री व सहकारमंत्री यांनी दि. ९ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या नार्को-कोऑर्डिनेशन सेंटर (NCORD) च्या ९व्या उच्चस्तरीय बैठकीत देशभरातील अमली पदार्थांच्या मागणीत मोजता येण्याजोगी घट घडवून आणण्यासाठी तीन वर्षांचा कालबद्ध कृती आराखडा तयार करून त्याची अंमलबजावणी करण्याचे स्पष्ट निर्देश दिले.

०३. उच्च शिक्षण संस्था (HEIs) मोठ्या आणि विविध युवकवर्गाला सेवा देत असल्याने, जोखमीतील व्यक्ती ओळखण्यासाठी आणि प्रतिबंधापासून पुनर्वसनापर्यंतच्या प्रक्रियेला बळकटी देण्यासाठी त्या महत्त्वपूर्ण भूमिका बजावू शकतात. या पार्श्वभूमीवर प्रस्तावित तीन वर्षांच्या कृती आराखड्यात समन्वित प्रयत्नांद्वारे उच्च शिक्षण संस्था व्यसनमुक्त करण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

०४. वरील बाबी लक्षात घेता, आपल्या अधिकार क्षेत्रातील अनुदानित तसेच खासगी क्षेत्रातील उच्च शिक्षण संस्थांमार्फत "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR) या

योजनेतंर्गत राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाबाबत उपाययोजना राबविण्याबाबत आवश्यक सूचना संदर्भाधीन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. (प्रत संलग्न)

०५. त्यानुसार "मादक पदार्थ सेवन प्रतिबंधात्मक राष्ट्रीय कृति योजना (NAPDDR) या योजनेतंर्गत आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व अनुदानित तसेच खासगी क्षेत्रातील उच्च शिक्षण संस्थांना सोबतच्या पत्रात नमूद उपक्रम राबविण्याबाबत कळविण्यात यावे. त्याबाबतचा अहवाल शासनास सादर करण्यात यावा. ही विनंती.

आपला,

(विवेक शिंदे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सोबत-वरीलप्रमाणे

प्रत,

निवडनस्ती(सामासु).

E-1699766

Vineet Joshi
Secretary
Department of Higher
Education

सत्यमेव जयते
Government of India

Sudhansh Pant
Secretary
Department of Social
Justice and Empowerment

D.O.No. DP/7/2023-DP-I

May 6, 2026

Dear Chief Secretary,

The Department of Social Justice & Empowerment (DoSJE), as the nodal Department for Drug Demand Reduction in the country, is implementing the National Action Plan for Drug Demand Reduction (NAPDDR) with a focused mandate to prevent substance abuse through sustained awareness and outreach. The Nasha Mukt Bharat Abhiyaan (NMBA), under the NAPDDR, was launched on 15th August 2020 and it being implemented in all districts, with priority focus on youth, women and educational institutions.

2. The Hon'ble Union Home Minister and Minister of Cooperation, during the 9th Apex Level Meeting of the Narco-Coordination Centre (NCORD) held on 09th January 2026, issued clear directions for formulation and implementation of a time-bound three-year action plan aimed at measurable reduction in drug demand across the country

3. Higher Education Institutions (HEIs), catering to a large and diverse youth population, hold immense potential as first-response platforms for identifying at-risk individuals and strengthening the prevention-to-rehabilitation continuum. In this context. a significant component of the proposed three-year action plan focuses on making HEIs drug-free through coordinated efforts.

4. In view of the above, it is requested that necessary instructions may be issued to all concerned Department dealing with HEIs in Central Government, State Government, Aided. as well as Private sector under your jurisdiction to undertake the following key interventions:

I. **Preventive Education**

Implementation of a 2-credit value addition course on substance use disorder for a students in HEIs. Detailed guidelines will be shared separately.

II. **Credit-based Internship Opportunities**

Facilitation of internships, particularly for students of social work and psychology. in:

a. DoSJE-supported de-addiction facilities

b. Addiction Treatment Facilities (ATFs) and de-addiction centres in medical colleg and government institutions

c. NGOs/VOs engaged in substance abuse prevention

d. State Drug Demand Reduction Cells

III. **Sensitization of Freshers**

Inclusion of a dedicated session on substance abuse prevention as part of the one-week induction programme for newly admitted students.

IV. Capacity Building

Training of faculty members, counsellors, and students on substance use disorder through platforms such as SWAYAM, Madan Mohan Malaviya National Mission on Teachers and Teaching (MMMNTT), and Chetna Lecture Series.

V. Awareness Generation and Behaviour Change Communication

a. Conduct awareness activities during annual fests, youth festivals, sports events, Vice-Chancellors' conferences, and through campus community radio stations (suggestive list enclosed).

b. Promotion of NMBA pledge:

- Offline pledge during key institutional events and national/international observances
- Wide publicity of the NMBA e-pledge portal among students and faculty

c. Sensitization regarding the 14446 helpline, including:

- Provision of counselling support
- Dissemination of helpline information to students and parents/guardians
- Awareness about DoSJE-supported de-addiction centres

d. Ensuring adequate media coverage of activities through institutional channels, local influencers, and other appropriate platforms

5. Your cooperation in mobilizing Higher Education Institutions towards creating Nasha Mukt Bharat is highly appreciated

With kind regards.

Yours sincerely,

Sudhansh Pant

( Sudhansh Pant )

( Vineet Joshi

Enclosure: As above

To
**The Chief Secretaries of all States/UTs**

Copy:
ACS / Principal Secretary / Secretary
Department of Higher Education of all States/UTs

Annexure – A

1. Organise NMBA awareness activities such as marathons, walkathons, debates, quizzes, cultural events, rallies, youth dialogues, workshops, and interactive forums.
2. Establish or strengthen counselling services in HEIs.
3. Integrate NMBA initiatives with national and international observance days.
4. Conduct neighbourhood sensitisation drives through NCC/MY Bharat volunteers.
5. Organise film screenings on drug prevention and healthy lifestyles.
6. Establish Anti-Drug Hostel Committees promoting wellness and prevention.
7. Designate a Drug-Free Campus Week with structured activities.
8. Run online campaigns, webinars, and social media engagement initiatives (e.g., #NashaMuktUniversity).
9. Any other activity as deemed appropriate by the competent authority.